**ठळक बातम्या**

- पश्चिम आशियातल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सच्या दरात १९५ रुपये वाढ/ घरगुती वापराच्या सिलेंडरच्या दरात बदल नाही

- विमान इंधनाच्या दरात देशी कंपन्यांसाठी साडेआठ टक्के वाढ/ परदेशी कंपन्यांसाठी दर दुपटीनं वाढले.

- गडचिरोलीत काल नऊ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- राज्यातल्या विविध भागात वादळी पाऊस आणि गारपिटीचा इशारा १४ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तेल विपणन कंपन्यांनी देशातल्या महानगरांमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सचे दर वाढवले आहेत. त्यामुळे व्यावसायिक वापरासाठीचे १९ किलो वजनी सिलिंडर्स आता दिल्लीत २ हजार ७८ रुपये ५० पैसे, तर मुंबईत २ हजार ३१ रुपये दराने मिळेल.

घरगुती वापराच्या सिलेंडर्सच्या दरात काहीही बदल झालेला नाही.

विमानासाठी वापरल्या जाणाऱ्या टर्बाईन इंधनाच्या दरात साडेआठ टक्के वाढ झाली असून, देशी कंपन्यासाठी ते दिल्लीत २ लाख ७ हजार रुपये प्रति किलोलीटर दराने तर मुंबईत १ लाख ९४ हजार रुपये, दराने मिळेल. परदेशी विमान कंपन्यांसाठी ही इंधन दरवाढ १०० टक्के करण्यात आली आहे.

जेट इंधनाच्या दरात अंशतः आणि टप्प्याटप्प्याने वाढ केल्यामुळे प्रवाशांना त्याचा तीव्र फटका बसणार नाही, असं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

एफसीआरए अर्थात परकीय चलन योगदान नियमन विधेयकावरून विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळे, आज अधिवेशन सुरू झाल्यावर पहिल्या पाट मिनिटांतच लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्यापूर्वी, विरोधी पक्षांनी संसद परिसरात या विधेयकाच्या विरोधात निदर्शनं केली. या घोषणाबाजीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि इतर अनेक विरोधी पक्षांच्या खासदारांनी सहभाग घेतला.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इसरोने अंतराळ कार्यक्रमातून मिळवलेल्या माहितीच्या आधारे सर्व समाजाला आणि विशेषतः मागासवर्गीयांना उपयोगाची असलेली अनेक ॲप्स तयार केली असल्याचं सरकारने म्हटलं आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. शेतकऱ्यांना उपयोगी उपग्रह आधारित हवामान माहिती, पीक विमा तसेच इतर सरकारी योजनांसाठी उपयोगी असलेली भौगोलिक माहिती या एप्समधून मिळू शकणार आहे.

अनुसूचित जाती जमातींसाठीच्या प्रवेशात २५ टक्क्यांची घट करून दिल्लीतलं जवाहरलाल नेहरू विद्यापीठ सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांना कमी लेखत असल्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांनी आज राज्यसभेत शून्य प्रहरात केला. जेएनयू आणि इतर केंद्रीय विद्यापीठांमध्ये आरक्षणाच्या नियमांचं काटेकोर पालन सुनिश्चित करण्याचं आवाहन त्यांनी सरकारला केलं.

खासदार सुधा मूर्ती यांनी लिहीलेल्या संसद भवनातल्या भित्तिचित्रांवर आधारित 'टाईड्स ऑफ टाईम' या पुस्तकाचं प्रकाशन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आज दिल्ली इथं झालं. संसद भवनातली ५८ भित्तिचित्रं ही केवळ कलाकृती नसून, ती देशाच्या सांस्कृतिक आणि नागरी सभ्यतेच्या प्रवासाचे प्रतीक असल्याचं उपराष्ट्रपती राधाकृष्णन यावेळी म्हणाले. यावेळी राज्यसभा उपाध्यक्ष हरिवंश, लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात आज झाली असून सहा दशकांपेक्षा जुन्या प्राप्तिकर कायद्याच्या जागी नवीन प्राप्तिकर कायदा लागू झाला आहे. यामध्ये जुन्या कायद्यातल्या कालबाह्य तरतुदी काढून टाकण्यात आल्या असून, नियम सुटसुटीत करण्यात आले आहेत. करदात्यांसाठी अनुपालन अधिक सुलभ करून करप्रणाली सोपी करण्याच्या उद्देशाने हा कायदा तयार करण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेनं दिलेल्या निर्देशानुसार, देशातल्या सर्व डिजिटल पेमेंट व्यवहारांसाठी आजपासून ‘टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन’चे नियम पाळणं बंधनकारक असेल. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी, ‘फास्टॅग’ च्या वार्षिक पासचं सुधारित शुल्क आजपासून लागू होईल. आणि पॅन कार्डसाठीचा अर्ज, तसंच ‘पॅन’ नंबर अद्ययावत करण्याबाबतचे सुधारित नियम देखील आजपासून लागू होतील.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर संकलनात मार्च २०२६मधे  ८ पूर्णांक ८ दशांश टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यात एकूण जीएसटी संकलन एक लाख ८३ हजार कोटी रुपये झालं होतं ते यंदा २ लाख कोटीहून जास्त झालं आहे.

देशांतर्गत करातून एक लाख ४६ हजार कोटी रुपये तर आयातीवरच्या करातून ५३ हजार ८६१ कोटी रुपये सरकारी तिजोरीत जमा झाले.

**<><><><>**

सेझ अर्थात विशेष आर्थिक क्षेत्रासाठी केंद्र सरकारने शुल्क सवलत जाहीर केली आहे. ज्या युनिटने ३१ मार्चला किंवा त्याआधी उत्पादन सुरू केलं आहे, त्यांच्यासाठीच ही सलवत लागू असेल असं महसूल विभागाने म्हटलं आहे.  सवलत मिळण्यासाठी माल सेझमधल्या युनिटमधेच उत्पादित झालेला असावा तसंच त्यात २० टक्के मूल्यवर्धन झालेलं असावं, असंही यात म्हटलं आहे.

**<><><><>**

गडचिरोली इथं काल नऊ नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी देशाच्या  संविधानाची प्रत  देऊन त्यांचं मुख्य प्रवाहात स्वागत केलं. या ९ जणांवर मिळून एकूण ३० लाख रुपयांचं बक्षीस होतं. आत्मसमर्पण करणारे सर्व नक्षलवादी छत्तीसगडमधे इंद्रावती क्षेत्रीय समिती आणि नॅशनल पार्क क्षेत्रीय समितीत कार्यरत होते. सध्या जिल्ह्यात सहा सशस्त्र नक्षली शिल्लक असल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.गडचिरोली जिल्ह्यात आता केवळ सहा सशस्त्र नक्षलवादी शिल्लक असून, जयराम गावडे हा एकमेव नक्षली गडचिरोली जिल्ह्याचा रहिवासी आहे, तर अन्य पाच जण छत्तीसगडमधील आहेत, असे नीलोत्पल यांनी सांगितलं.

शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी  आणि भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी काल एकत्र  जयराम गावडेच्या घरी भेट देऊन त्याच्या वडिलांशी संवाद साधला आणि त्याने शस्त्रत्याग करावा असं आवाहन केलं.

**<><><><>**

भोंदू बाबा अशोक खरातला नाशिक सत्र न्यायालयानं आज १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली. खरातवर अनेक गुन्हे दाखल झाले असून १४ मार्चला त्याला प्रथम अटक केली होती. या गुन्ह्यातील पोलीस कोठडीची मुदत आज संपल्यानं त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं. दरम्यान, खरात याच्यावर दाखल दुसऱ्या गुन्ह्यात त्याला अटक करण्यासाठी नाशिक पोलीस उद्या कायदेशीर कारवाई करणार असल्याचं पोलिसांनी सांगितलं. दरम्यान खरात याच्या मुलाला काल शिर्डी पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं. शिर्डी इथ एका जमीन घोटाळ्यात खरातच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून तिचा शोध घेण्यात येत आहे, असं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

ठाणे शहरात प्रत्येक भागातला प्रवास सुखकर होण्यासाठी पॉड टॅक्सी सेवा लवकरच सुरु होणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते काल ठाण्यात एका कार्यक्रमात बोलत होते. सागरी किनारा महामार्ग, ठाणे बोरिवली दुतर्फा बोगदा आणि पॉड टॅक्सीमुळे शहरातल्या नागरिकांचा प्रवास सुखकर होणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने आयोजित केलेल्या ‘स्वच्छ भिवंडी स्पर्धा २०२६’ ला आजपासून सुरुवात झाली असून ती ३१ जुलैपर्यंत सुरु राहील. कचऱ्याचं वर्गीकरण, स्वच्छता आणि सुशोभीकरण, ओल्या कचऱ्याचं कंपोस्टीकरण आणि कचऱ्याचे प्रमाण कमी करणं, पुनर्वापर, पुनर्चक्रीकरण या त्रिसूत्रीचा वापर असे काही निकष या स्पर्धेसाठी लावले जाणार आहेत.

<><><><><>

सनदी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी नुकतीच प्रभारी विभागीय आयुक्त सिद्धराम सालीमठ यांच्याकडून कोकण विभागीय आयुक्त पदाची सूत्र स्वीकारली. या पदावर येण्यापूर्वी त्या महामुंबई मेट्रो संचालन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होत्या. अग्रवाल या २००८ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असून उत्तम प्रशासकीय सेवेबद्दल त्यांना आतापर्यंत उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कारासहित इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

इंडीयन प्रिमियर लिग- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनऊ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. लखनऊ इथं संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरूवात होईल. काल झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सनं गुजरात टायटन्सवर तीन गडी राखून विजय मिळवला.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात एकवीरा देवीची यात्रा आजपासून सुरु झाली. आज पहिल्या दिवशी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. उद्या एकवीरा देवीची रथातून शोभायात्रा निघेल. येत्या २० एप्रिल पर्यंत चालणाऱ्या यात्रेसाठी होणारी गर्दी लक्षात घेता, धुळे जिल्हा प्रशासनानं यात्रा परिसरात सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी केली आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज आहे.

अमरावती, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये आज, तर धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नाशिक घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजी नगर, जालना आणि बीड या जिल्ह्यांनमध्ये उद्या पाऊस आणि गारपिटीची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

तर बुलडाणा, वाशीम, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि गडचिरोली या जिल्ह्यांना आज पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><><>//**